# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद नाशिक

3 रा मजला,आरोग्य विभाग,जिल्हा परिषद आवार,नविन सी.बी.एस जवळ, त्र्यंबक रोड, नाशिक,पिनकोड-422001

संपर्क क्र. 0253-2508512 - (कार्यालयीन) ई-मेल- dhonashik@gmail.com


जा.क्र.आरोग्य/आस्था- 3/ 05 /2026,
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद नाशिक
दिनांक- 01.01.2026

**प्रति,**

तालुका आरोग्य अधिकारी,
पंचायत समिती (सर्व), जि.नाशिक

**विषय:**- जिल्हा परिषद नाशिक, आरोग्य विभागांतर्गत दि. 01 **जानेवारी, 2026** रोजी **आरोगय पर्यवेक्षक** या पदावर कार्यरत असलेल्या **दिव्यांग** कर्मचाऱ्यांची प्रारुप जेष्ठता यादी प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ:- 1) दिव्यांग समान संधी संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण अधिनियम 1995.
2) महा.शासन साप्रवि शासन परिपत्रक क्र.अपंग-1008/प्र.क्र.111/16-अ,दि.8/9/2008.

शासनाचे वरील निर्णयांनुसार जिल्हा परिषद संवर्गातील वर्ग 3 व 4 कर्मचाऱ्यांची सेवाजेष्ठता प्रसिध्द करणेबाबत सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार आरोग्य विभागातर्गत **आरोगय पर्यवेक्षक (दिव्यांग)** या संवर्गाची दि. 01/01/2026 रोजीची प्रारुप यादी प्रसिध्द करणेसाठी समवेत सादर करण्यात येत आहे.

सदर जेष्ठता यादी आपले गटात कार्यरत असले कर्मचारी यांचे निदर्शनास प्रारुप जेष्ठतायादी प्रसिध्दीच्या दिनांकापासुन 07 दिवसापावेतो आनुन देवुन संबंधीतांची स्वाक्षरी सोबतचे **प्रपत्र अ** मध्ये घेऊन पुराव्याकामी गटस्तरावर जपुन ठेवावीत. तसेच आपले अधिनस्त असलेल्या कर्मचाऱ्यांपैकी जर कर्मचाऱ्याचे नाव या यादीत समाविष्ठ नसेल तसेच जन्मदिनांक, नियुक्ती दिनांक, नोंद इ. नमुद नसेल तर आपले आक्षेपाचे अहवालात नावानिशी दिनांक नमुद करुन तसे या कार्यालयास कळवावे.

तसेच ज्या कर्मचाऱ्यांना जेष्ठता यादीतील माहिती बाबत आक्षेप घ्यावयाचा आहे त्यांनी यादी प्रसिध्दीच्या दिनांकापासुन **आठ** (08) दिवसात सोबतचे **प्रपत्र ब** मधील नमुन्यात आक्षेप पुराव्याच्या कागदपत्रांसह नोंदवावा. पंचायत समिती स्तरावरुन प्राप्त आक्षेपांबाबत योग्य अथवा अयोग्य आक्षेपाची पुराव्यानशी अशी शिफारस द्यावी.

सदर पत्रातील सुचनेप्रमाणे कार्यवाही करुन प्रत्येक कार्यालाने **प्रपत्र - ब** मध्ये परिपुर्ण माहिती तयार करुन योग्य तेथे पुराव्याचे कागदपत्रे जोडुन मुदतीत अहवाल **प्रपत्र-क** नुसारचे प्रमाणपत्रासह 09 दिवसांचे आत सादर करावे. तसेच आपले गटात सध्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याचे नाव सदर जेष्ठता यादीत समाविष्ठ नसतील तर तसे या कार्यालयास लेखी स्वरुपात अवगत करावे. वरील मुदतीत प्रपत्रांसहचा अहवाल सादर केला नाही तर आपल्या कार्यालयाची दुरुस्त करावयाची माहिती निरंक आहे तसेच कोणत्याही कर्मचाऱ्यास आक्षेप घ्यावयाचा नाही असे गृहीत धरुन सदर गटाचा आक्षेप नसले बाबत जेष्ठतासूची अंतीम करण्याची कार्यवाही करण्यात येईल. तसेच अशा कार्यवाहीमुळे आपल्या कार्यालयांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्याचे चुकीच्या माहितीमुळे त्याचेवर अन्याय झाला किंवा ते पदोन्नती पासुन वंचित राहील अशी तक्रार प्राप्त झाल्यावर त्याची सर्वस्वी जबाबदारी ही आपल्या कार्यालयातील सर्व संबंधीत अधिकारी / संबधीत कर्मचारी यांची राहील.

**तालुका आरोग्य अधिकारी यांनी त्यांचे एकाच पत्रासोबत पात्र सर्व आक्षेप व प्रमाणपत्र संवर्ग निहाय सादर करावे.**

**सोबत- वर नमुद केले प्रमाणे.**

**(डॉ. सुधाकर मोरे)**
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद नाशिक

प्रत - 1) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद नाशिक यांना माहीतीसाठी सविनय सादर.
2) म.उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि),जिल्हा परिषद नाशिक यांना माहीतीसाठी सविनय सादर
3) कार्यालयीन नस्ती.

Scanned with OKEN Scanner

**प्रपत्र-अ**

**(गट स्तरावर पुराव्यानशी कामी जपुन ठेवावे )**

| अ.क्र. | कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | प्रारुप जेष्ठता सुची 2026 मधील क्रमांक | प्रारुप जेष्ठतासुची निदर्शनास आणुन दिले बाबतची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

**तालुका आरोग्य अधिकारी**
**पंचायत समिती** ---------

---

**प्रपत्र-ब**

**( प्रत्येक कर्मचाऱ्याचे संवर्ग निहाय स्वतंत्र आक्षेप घेण्यात यावे )**

| प्रारुप जेष्ठता सुची 2026 मधील क्रमांक | कर्मचाऱ्याचे नाव | हुद्दा | आक्षेप काय आहे व पुराव्याचे ता.आअ. यांचे सत्यप्रतसह कागदपत्रे काय जोडली आहे. | ग.वि.अ. यांचे अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| | | | | |

कर्मचाऱ्याची स्वाक्षरी

**तालुका आरोग्य अधिकारी**
**पंचायत समिती** ---------

---

**प्रपत्र- क**

## प्रमाणपत्र

या द्वारे प्रमाणित करण्यात येते की, **पंचायत समिती** ----------- **अंतर्गत** कार्यरत असलेल्या **एकुण** ---- कर्मचाऱ्यांना त्यांचे यापदाची ------------------------ दिनांक 01/01/2026 रोजीची प्रारुप जेष्ठतासूची निदर्शनास आनुन दिलेली आहे. त्यापैकी **केवळ** ---------------- आक्षेप पुराव्याचे कागदपत्रांसह नोंदविलेले आहे. **सदरचे सर्व आक्षेप या सोबत जोडुन सादर करण्यात येत आहे. या व्यतीरिक्त् या गटाकडील आक्षेप काही नाही.**

**तालुका आरोग्य अधिकारी**

Scanned with OKEN Scanner

# आरोग्य विभाग जिल्हा परिषद नाशिक

## आरोग्य पर्यवेक्षक संवर्गातील दिनांक 01/01/2026 रोजी कार्यरत दिव्यांग कर्मचारी यांची प्रारुप सेवाजेष्ठता यादी

| अ.क्र | कर्मचा-याचे नाव | जात/ प्रवर्ग | नेमणुकीचा प्रवर्ग | जन्म दिवस | | | सरळसेवेने नियुक्ती दिनांक | | | पदोन्नतीचे पदावर हजर दिनांक - आरोग्य सहाय्यक | | | पदोन्नतीचे पदावर हजर दिनांक - आरोग्य पर्यवेक्षक | | | सेवानिवृत्तीचा दिनांक | | | शैक्षणिक अर्हता प्रशिक्षण पास /नापास) | दिव्यांग प्रवर्गातून नियुक्ती झाली आहे काय होय/ नाही | दिव्यांगत्व | | दिव्यांग प्रमाणपत्र दिनांक | | | दिव्यांग प्रमाणपत्राची नोंद सेवापुस्तकात घेतली आहे का | युडीआयकार्ड नंबर | कार्यरत कार्यालयाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | दिवस | महिना | वर्ष | दिवस | महिना | वर्ष | दिवस | महिना | वर्ष | दिवस | महिना | वर्ष | दिवस | महिना | वर्ष | | | प्रकार | टक्केवारी | दि | म | वर्ष | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 | 27 | 28 | 29 | 30 |
| 1 | श्री.राजेश अण्णा निकुंभ | लोहार | भ.ज.ब | 23 | 5 | 1972 | 9 | 6 | 1995 | 7 | 12 | 2007 | 6 | 11 | 2020 | 31 | 5 | 2030 | स्व.नि.कोर्स उत्तीर्ण | होय | अस्थिव्यंग | 40 | 18 | 11 | 1987 | होय | MH2050619720049469 | पं.स. देवळा | |
| 2 | श्री. अब्दुल सतार शेख | मुस्लिम | खुला | 24 | 3 | 1974 | 22 | 4 | 1999 | 7 | 12 | 2007 | 6 | 11 | 2020 | 31 | 3 | 2032 | स्व.नि.कोर्स उत्तीर्ण | होय | अल्पदृष्टी | 40 | 7 | 11 | 2007 | होय | MH208071974028192 | पं.स. नाशिक | |
| 3 | श्री. बाळासाहेब गोविंद ठाकरे पाटील | हिं.मराठा | खुला | 13 | 11 | 1974 | 17 | 5 | 1999 | 16 | 9 | 2016 | 1 | 3 | 2023 | 30 | 11 | 2032 | स्व.नि.कोर्स उत्तीर्ण | होय | कर्णबधीर | 54 | 1 | 11 | 2013 | होय | MH0230019740244764 | आरोग्य विभाग जि.प.नाशिक | |

(सही)

डॉ सुधाकर मोरे
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, नाशिक

Scanned with OKEN Scanner